CNR-No.MHLA150001023-2016

**<u>रे.दि.मु.नं. १५४/२०१६ मधील नि.क्र.५६ खालील आदेश</u>**

(पार्वती व इतर वि... प्रयागबाई व इतर )

1. प्रतिवादी क्र. ३ ने सदरचा अर्ज दि.०३.०५.१९९४ रोजीचे मुळ वाटणीपत्र मौजे आष्टा येथील तलाठी यांच्याकडून मागविण्याकरीता दाखल केलेला आहे. त्याचे थोडक्यात कथन असे की, सदर प्रकरणात वादीने वाटणीपत्राची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे, परंतू ते मुळ नसल्यामुळे त्यास आज पावतो निशाणी देण्यात आलेली नाही. सदरचे मुळ वाटणीपत्र हे फेरफारच्या नोंदी घेण्याकरीता तलाठी, मौजे आष्टा यांना देण्यात आलेले आहे. सदरचे वाटणीपत्र सिध्द करण्याकरीता संबंधीत तलाठयाकडून मागविणे आवश्यक आहे, त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ ने सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

2. याउलट, वादीच्या वकीलांनी कथन केले की, सदरचा अर्ज योग्य नाही. सदर प्रकरणात प्रतिवादीतर्फे वाटणी बाबतचा दस्त कशासाठी आवश्यक आहे याबाबतचे कारण अर्जामध्ये दिलेले नाही. वाटणी बाबतच्या कोणताही मुद्दा प्रतिवादी याच्यावर नाही. तसेच मुळ दस्त हा पक्षकाराकडे असल्यामुळे सदर अर्जाप्रमाणे फेरफार संबंधीची कागदपत्र मागविण्याची गरज नाही. प्रतिवादीतर्फे साक्ष पुरावा देण्यासाठी टाळाटाळ केली जात आहे व प्रकरण वाढविण्यासाठी प्रयत्न केला जात आहे, त्यामुळे त्याने सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

3. प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर प्रकरण हे वाटणीकरीता वादीने दाखल केलेले असून सदर प्रकरणातील वाद मिळकतीची वाटणी झाली नसल्याचे वादीचे कथन आहे. याउलट, प्रतिवादी क्र.१ ते ३ व ६ ते ८ यांनी नि.क्र. ३४ वरील जबाबदाव्यानुसार वादी क्र. १ च्या पतीला १९९४ साली वाटणी आधारे हिस्सा मिळाल्याचे कथन परिच्छेद क्र.४ मध्ये केलेले आहे. तसेच परिच्छेद क्र. १९ मध्ये सुध्दा सदर वाटणी दि. ०३.०५.१९९४ रोजी झाल्याचा मजकूर नमुद आहे. त्यामुळे प्रकरणाचे स्वरुप वादपत्र, प्रतिवादींचे कथन व जबाबदावा आणि अभिलेखावर आलेला पुरावा बघता, सदर प्रकरणाचे गुण दोषावर निराकरण करण्याकरीता प्रतिवादी क्र. ३ ने कथन केलेले वाटणीपत्र सदर तलाठयाकडे फेरफार करीता दिल्याची बाब बघता प्रतिवादी क्र. ३ चा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज साक्षी भत्यावर मंजुर करण्यात येत आहे.

२. मौजे आष्टा ता. चाकूर येथील संबंधीत तलाठी यांना दि.०३.०५.१९९४ रोजीचे संबंधीत मुळ वाटणीपत्र घेऊन येण्याचे त्यांना निर्देशीत करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र. ३ यांनी सदर साक्षीभत्ता नियमानुसार भरावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Yogesh Dattatray Koinkar
Date: 2020.01.28 17:00:03 +0530

स्थळ– चाकूर

दिनांक– २८/०१/२०२०

**(योगेश डी. कोईनकर)**

सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, चाकूर